महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,

# आणि

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,

# पानचक्की रोड, घाटी परीसर, छत्रपती संभाजीनगर.

ई मेल: deangmcha@gmail.com वेबसाईट: www.gmcaurangabad.com दुरध्वनी क्रमांक:- ०२४०-२४०२४१२-१८

जाहिरात क्रमांक शावैमरुछसंन/सरळसेवा/गट-ड/ २३६६/२०२५ दिनांक:- 26 MAY 2025

:: जाहिरात ::

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अधिनस्त असलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर या संस्थेतील गट-ड (वर्ग-४) समकक्ष पदे व इतर संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरिता ऑनलाइन (Computer Based Test) स्पर्धा परीक्षेसाठी अर्हता प्राप्त उमेदवारांकडून विहित नमुण्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. उमेदवाराची शैक्षणिक अर्हता, पदांचा तपशील, शासनाच्या नियमानुसार संवैधानिक आरक्षण व समांतर आरक्षण, स्पर्धा परीक्षेचा अभ्यासक्रम आणि अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सुचना इत्यादीची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

### १. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

| अ.क्र. | पदाचे नाव | पदाची वेतनश्रेणी | रिक्त पदाची संख्या |
|---|---|---|---|
| १ | चतुर्थश्रेणी कर्मचारी व समकक्ष पदे | एस-१ (रु. १५०००-४७६००) | ३० |
| २ | आया | एस-१ (रु. १५०००-४७६००) | २ |
| ३ | माळी | एस-१ (रु. १५०००-४७६००) | ७ |
| ४ | प्रयोगशाळा परिचर | एस-६ (रु. १९९००-६३२००) | १८ |

### २. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर

| अ.क्र. | पदाचे नाव | पदाची वेतनश्रेणी | रिक्त पदाची संख्या |
|---|---|---|---|
| १ | चतुर्थश्रेणी कर्मचारी व समकक्ष पदे | एस-१ (रु. १५०००-४७६००) | २८५ |
| २ | दाया | एस-१ (रु. १५०००-४७६००) | १ |
| ३ | बॉयलर चालक | एस-१ (रु. १५०००-४७६००) | १ |
| ४ | पाणक्या | एस-१ (रु. १५०००-४७६००) | १ |
| ५ | ड्रेसर | एस-१ (रु. १५०००-४७६००) | २ |
| ६ | माळी | एस-१ (रु. १५०००-४७६००) | ४ |
| ७ | नाभिक | एस-१ (रु. १५०००-४७६००) | ६ |

२. प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या गट ड (वर्ग ४) समकक्ष पदे व इतर संवर्गातील सर्व पदांचा सविस्तर तपशील (परिशिष्ट-१) मध्ये www.gmcaurangabad.com या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

३. परीक्षा दिनांक याबाबतची माहिती www.gmcaurangabad.com संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच उमेदवारांना प्रवेशपत्राद्वारे कळविण्यात येईल.

३.१ प्रस्तुत जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अटी व शर्तींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांकडून शासनाच्या ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज मागविण्यात येत आहे.

३.२ जाहिरातीची माहिती www.gmcaurangabad.com या लिंकवर उपलब्ध आहे.

४. पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी:

४.१ पदसंख्या व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागांच्या सूचनेनुसार बदल (कमी/जास्त) होण्याची शक्यता आहे.

४.२ पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल झाल्यास याबाबतची सूचना वेळोवेळी कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या सूचनांच्या आधारे प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या पदांकरिता भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

४.३ महिलांसाठी आरक्षित पदांकरीता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवास (Domiciled) असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे तसेच महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक महिला २०२३/प्र.क्र १२३/कार्या-२ दिनांक ४ मे २०२३ अन्वये खुल्या गटातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरती निवडीकरीता नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची अट रद्द करण्यात आलेली आहे. अनुसूचित जाती व अनुसुचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करू इच्छिणाऱ्या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागास वर्ग व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

४.४ विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्यावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

४.५ अर्ज करताना एखादी जात/जमात राज्य शासनाकडून आरक्षणासाठी पात्र असल्याचे घोषित केली असल्यास तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्र उमेदवाराकडे अर्ज करतानाच उपलब्ध असेल तर संबंधित जात/जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील.

४.६ समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ दिनांक १३ ऑगस्ट २०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण १११८/प्र.क्र ३९/१६-अ, दिनांक १९ डिसेंबर २०१८ आणि सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक राआधो ४०२४/प्र.क्र.१४/१६ अ मंत्रालय, मुंबई दिनांक २० जानेवारी २०२४ तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

४.७ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन, विभाग क्रमांक राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दिनांक १२ फेब्रुवारी २०१९ व दिनांक ३१ मे २०२१ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल तसेच सदर संवर्गातील उमेदवारांकरिता शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

४.८ शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सीबीसी २०१२/प्र.क्र.१८२/विजाभज-१, दिनांक २५ मार्च, २०१३ अन्वये विहित कार्यपध्दतीनुसार तसेच शासन शुध्दीपत्रक संबंधित जाहिरातीमध्ये नमूद अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांकास, संबंधित उमेदवार उन्नत आणि प्रगत गटामध्ये मोडत नसल्याबाबतची पडताळणी करण्यासाठी, गृहित धरण्यात येईल.

४.९ शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सीबीसी १०१३/प्र.क्र.१८२/विजाभज-१, दिनांक १७ ऑगस्ट, २०१३ अन्वये जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार उन्नत आणि प्रगत गटामध्ये मोडत नसल्याच्या नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राच्या वैधतेचा कालावधी विचारात घेण्यात येईल.

४.१० सदर जाहिरात सामाजिक आणि शैक्षणीक दृष्ट्या मागास वर्ग अधिनियम दिनांक २६ फेब्रुवारी २०२४ व संबंधित शासन निर्णय दिनांक २७ फेब्रुवारी २०२४ संदर्भात मा. उच्च न्यायालयात दाखल आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्याय निर्णयाच्या अधिन राहून प्रसिध्द करण्यात येत आहे. या जाहिरातीसंबंधित निवड व नियुक्त्या सदर संदर्भित न्यायीक प्रकरणाच्या अधिन राहून करण्यात येतील.

४.११ शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी/प्र.क्र.७५/१६-क दिनांक २७ फेब्रुवारी २०२४ अन्वये सामाजिक व शैक्षणीक मागास प्रवर्गाकरिता आरक्षण विहित करण्यात आले असून, शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-२०२४/प्र.क्र.७५/आरक्षण ५ दिनांक २८ जुन २०२४ व ५ जुलै २०२४ अन्वये विहित करण्यात आलेले जात प्रमाणपत्र आणि नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

४.१२ शासन शुध्दिपत्रक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्रमांक: संकीर्ण-२०२३/प्र.क्र.७६/मावक दिनांक ०९ मार्च २०२३ अन्वये शासनाकडून जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार, संबंधित उमेदवार उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतची पडताळणी करण्यासाठी सन २०२४-२५ व २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

४.१३ सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा, अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करण्याबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल.

४.१४ अराखीव (खुला) उमेदवारांकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषासंदर्भातील अटींची पुर्तता करणाऱ्या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशी करीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित उपलब्ध नसले तरी अर्जामध्ये त्यांच्या मुळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचुकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

४.१५ कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसामान्य रहिवासी असणाऱ्या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसामान्य रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधित्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.

४.१६ कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा (सामाजिक अथवा समांतर) अथवा सोयी सवलतींचा दावा करणाऱ्या उमेदवाराकडे संबंधित कायदा नियम आदेशानुसार विहित नमुन्यातील प्रस्तुत जाहिरातीस अनुसरून अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेल्या दिनांकापूर्वीचे वैध प्रमाणपत्र उपलब्ध असणे अनिवार्य आहे.
४.१७ सामाजिक व समांतर आरक्षणा संदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ट प्रकरणी, अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

४.१८ खेळाडू आरक्षण :-

४.१८.१ शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र. ६८/क्रीयुसे-२ दिनांक १८ ऑगस्ट, २०१६, शुध्दीपत्रक दिनांक १७ ऑक्टोबर २०१७, शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक संकीर्ण-१७१६/प्र. क्र. १८/क्रीयुसे-२, दिनांक ३० जुन, २०२२ आणि तद्नंतर शासनाने सासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलती संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

४.१८.२ प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तीसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवाराच्या बाबतीत, क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकारी याने प्रमाणित केलेले पडताळणी प्राविण्य प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास किंवा तत्पूर्वीचे असणे बंधनकारक आहे.

४.१८.३ खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच तो खेळाडू कोणत्या संवर्गासाठी आरक्षित पदावरील निवडी करीता पात्र ठरतो, या विषयीच्या पडताळणी करीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे, अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही.

४.१८.४ एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणाऱ्या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांकडे सादर करणे बंधनकारक आहे.

४.१८.५ कागदपत्रे पडताळणीच्या वेळी खेळाडू उमेदवारांनी विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र तसेच त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत तसेच खेळाडू कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडी करीता पात्र ठरतो, या विषयीचा सक्षम प्राधिकाऱ्यांने प्रदान केलेले प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणी बाबतचा अहवाल सादर केला तरच उमेदवारांचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर नियुक्ती करीता विचार करण्यात येईल.

४.१९ दिव्यांग आरक्षण

४.१९.१ दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग २०१८/प्र. क्र.११४/१८-अ दिनांक २१ मे, २०१९ तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तीच्या आरक्षणा संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

४.१९.२ वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्र. संकीर्ण-१०२१/प्र.क्र.५६/२१/वैसेवा-१ दिनांक १७ जून २०२१ नुसार दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार गट-ड (वर्ग-४) या संवर्गाची समकक्ष पदे दिव्यांग शासन सेवेसाठी सुनिश्चित केली आहे. सदर पदाचा तपशिल (परिशिष्ट-१) www.gmcaurangabad.com संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.
४.१९.३ दिव्यांग व्यक्तीसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.
४.१९.४ दिव्यांग व्यक्तीची संबंधित संवर्ग पदाकरीता पात्रता शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशा नुसार राहील.
४.१९.५ दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित पदांवर निवड/नियुक्ती करतांना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता दिव्यांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्यांची निवड/नियुक्ती करण्यात येईल.
४.१९.६ संबंधित दिव्यांगत्वाच्या प्रकारचे किमान ४०% दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र धारक उमेदवार/व्यक्ती आरक्षण तसेच नियमानुसार अनुज्ञेय सोयी सवलतीसाठी पात्र असतील.

४.१९.७ लक्षणीय दिव्यांगत्व असलेले उमेदवार व्यक्ती खालील सवलतीच्या दाव्यास पात्र असतील:-
अ. दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पदे लक्षणीय दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित असल्यास नियमा नुसार अनुज्ञेय आरक्षण व इतर सोयी सवलती,
ब. दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पदे संबंधित दिव्यांग प्रकारासाठी सुनिश्चित केले असल्यास नियमानुसार अनुज्ञेय सोयी सवलती.

४.१९.८ दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही सवलतीचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य ६ दिनांक १४ सप्टेंबर २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM संगणकीय प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आलेले नविन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

४.१९.९ दिव्यांग उमेदवारांनी अर्ज करताना शासन परिपत्रक दिव्यांग कल्याण विभाग क्रमांक दिव्यांग-२०२४/प्र.क्र. ८६/दि.क.२ दिनांक २७ जून २०२४ मधील सर्व तरतुदींचे अवलोकन करण्यात यावे. त्यातील तरतुदीनुसार दिव्यांग व्यक्तीच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

४.१९.१० दिव्यांग उमेदवारांना अर्जामध्ये नमुद केलेला दिव्यांगत्वाचा प्रकार/उपप्रकार बदलणे अनुज्ञेय नाही.

४.२० अनाथ आरक्षण :-

४.२०.१ अनाथ व्यक्तीचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अनाथ-२०२२/प्र.क्र./१२२/का-०३ दिनांक ६ एप्रिल २०२३, व समक्रमांकाचे शासन पूरक पत्र दिनांक १० मे २०२३, सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक राआधो ४०२४/प्र.क्र.१४/१६-अ मंत्रालय मुंबई २० जानेवारी २०२४ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार राहील.
४.२०.२ महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभागाकडील. शासन निर्णय क्रमांक अनाथ-२०१८/प्र. क्र.१८२/का-०३ दिनांक ०६ सप्टेंबर २०२२ तसेच दिनांक ६ एप्रिल २०२३, सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक राआधो ४०२४/प्र.१४/१६-अ मंत्रालय, मुंबई दिनांक २० जानेवारी २०२४ अन्वये अनाथ प्रवर्गासाठी दावा दाखल करणाऱ्या उमेदवाराने अर्ज सादर करतेवेळी महिला व बाल विकास विभाग यांच्याकडील सक्षम प्राधिकारी यांचे विहित नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा अनाथ आरक्षणाचा दावा विचारात घेतला जाणार नाही.
४.२०.३ अनाथ आरक्षणाचा लाभ घेऊन शासन सेवेत रूजु होणाऱ्या उमेदवाराला अनाथ प्रमाणपत्र पडताळणीच्या अधिन राहुन तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती देण्यात येईल. नियुक्ती पश्चात ६ महिण्याच्या कालावधीत आयुक्त बालविकास, पुणे यांच्याकडुन अनाथ प्रमाणपत्राची पडताळणी करून घेणे आवश्यक राहील.
४.२०.४ अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवाराचा समावेश उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे, त्या प्रवर्गातुन करण्यात येईल.

४.२१ माजी सैनिक आरक्षण

४.२१.१ गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केली असल्यास, मुळ प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या कागदपत्रांची सक्षम अधिकाऱ्याकडून पडताळणी झाल्याशिवाय त्यांना नियुक्ती आदेश देण्यात येणार नाहीत. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. आरटीए-१०८२/३५०२। सीआर-१००/१६-3 दिनांक २ सप्टेंबर १९८३ नुसार

अ. माजी सैनिकांसाठी आरक्षित असलेल्या पदांवर भरती करताना युध्द काळात किंवा युध्द नसताना सैन्यातील सेवेमुळे दिव्यांगत्व आले असल्यास अशा माजी सैनिकास १५% राखीव पदांपैकी उपलब्ध पदांवर प्राधान्य क्रमाने नियुक्ती देण्यास पात्र राहील.

ब.युध्द काळात किंवा युध्द नसताना सैनिकी सेवेत मृत झालेल्या किंवा अपंगत्व येऊन त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकाच्या कुटुंबातील फक्त एका व्यक्तीला त्या नंतरच्या पसंती क्रमाने १५% टक्के आरक्षित पदापैकी उपलब्ध पदावर नियुक्तीस पात्र राहील तथापी, सदर उमेदवाराने जाहिरातीत नमुद गट-ड (वर्ग-४) पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे आवश्यक आहे.

४.२२ प्रकल्प ग्रस्त आरक्षण :-

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एईएम १०८०/३५/१६-अ दिनांक २० जानेवारी १९८० व तदनंतर संदर्भात शासनाकडून वेळोवेळी नमूद करण्यात येणाऱ्या आदेशानुसार प्रकल्प ग्रस्तांसाठी आरक्षण राहील. गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या प्रकल्प ग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचेकडील प्रकल्प ग्रस्त असलेबाबतचा शासकीय नोकरी मिळणेसाठी विहित केलेले मूळ प्रमाणपत्र/कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील. ऑनलाईन/लेखी परीक्षेत निवड झालेल्या प्रकल्प ग्रस्त उमेदवाराचे मूळ प्रमाणपत्र हे संबंधित प्रमाणपत्र निर्गमित करणाऱ्या अधिकारी यांच्या कार्यालयाकडून पडताळणी करुन घेतले जाईल. सदर पडताळणी अंती प्राप्त होणाऱ्या अहवालाच्या आधारे सदर प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती आदेश देणे बाबतची कार्यवाही करण्यात येईल.

४.२३ भुकंप ग्रस्त आरक्षण :-

गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या भूकंप ग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचेकडील भूकंप ग्रस्त असलेबाबतचे शासकीय नोकरी मिळणेसाठी विहित केलेले मूळ प्रमाणपत्र/कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील. परीक्षेत निवड झालेल्या भूकंप ग्रस्त उमेदवाराचे मूळ प्रमाणपत्र हे संबंधित प्रमाणपत्र निर्गमित करणाऱ्या अधिकारी यांच्या कार्यालयाकडून पडताळणी करून घेतले जाईल सदर पडताळणी अंती प्राप्त होणाऱ्या अहवालाच्या आधारे सदर प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती आदेश देणे बाबतची कार्यवाही करण्यात येईल.

**४.२२ पदवीधर अंशकालीन कर्मचारी यांच्या करीता आरक्षण:-**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ दि.२७.१०.२००९ व क्र. अशंका-१९१३/प्र.क्र.५७/२०१३/१६-अ. दिनांक १९/०९/२०१३ नुसार शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या उमेदवाराने सदरच्या अनुभवाची रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये नोंद केलेली असणे आवश्यक राहील. निवड झालेल्या अंशकालीन कर्मचाऱ्यांची त्यांच्या अनुभवाचे सेवायोजन कार्यालयाकडील मूळ प्रमाणपत्र व तहसिलदार यांचेकडील प्रमाणपत्र/कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

**५. पदाच्या निवडीसाठी कार्यपध्दती, आवश्यक कागदपत्रे तसेच महत्वाच्या अटी व शर्ती (सर्व उमेदवारांसाठी) :-**

५.१ जाहिरातीमध्ये नमुद गट-ड (वर्ग-४) समकक्ष पदे व इतर संवर्गातील पदांसाठी अर्ज केलेला उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा व त्याच्याकडे महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) असणे आवश्यक आहे.

५.२ जाहिरातीमध्ये नमुद गट-ड (वर्ग-४) समकक्ष पदे व इतर संवर्गातील पदांसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांसाठी शासन निर्णय क्र.रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१० दिनांक १७ जून २०११ नुसार ज्या परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला (Birth Certificate) सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात अधिवास प्रमाणपत्राची अट लागु राहणार नाही. सदर परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या परिक्षार्थीने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याचा दाखल्यामध्ये त्या परिक्षार्थींचा जन्म हा महाराष्ट्र राज्यात झाल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात अधिवास प्रमाणपत्राची अट लागु राहणार नाही. ज्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला नसेल परंतु महाराष्ट्र राज्यातील रहिवाशी, सलग १५ वर्षे व त्यापेक्षा अधिक कालावधीचा आहे, अशा परीक्षार्थी उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

५.३. उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेला बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

५.४ आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना त्या संवर्गातील सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र (Caste Certificate) व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र (Validity Certificate) निवडी अंती विहित मुदतीत सादर करणे आवश्यक आहे.

५.५. जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२/१२/२०११ मधील तरतूदी नुसार, याचिका क्र. [illegible] व अन्य याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक [illegible] रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या याचिकेवरील अंतिम आदेशाच्या अधीन राहून तात्पुरती नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांका पासून ०६ महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांची नियुक्ती पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल.

५.६ उमेदवारांना परीक्षेसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. परीक्षेसाठी नेमून दिलेल्या परीक्षा केंद्रावर दिलेल्या वेळेपूर्वी २ तास अगोदर उपस्थित रहावे.

५.७ नियुक्त होणाऱ्या उमेदवारास शासन निर्णय दिनांक ३१/१०/२००५ नुसार लागु करण्यात आलेली नवीन परिभाषित अंशदायी निवृत्ती वेतन योजना (New Defined Contributory Pension Scheme) लागू राहील त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू राहणार नाही. तथापी, सदर नियमात भविष्यात काही बदल झाल्यास त्या प्रमाणे योजना लागू राहील.

५.८ सदर भरती प्रक्रिया जिल्हास्तरावरून एकत्रितरित्या राबविली जात असली तरी, सदर गट-ड (वर्ग-४) समकक्ष पदे व इतर संवर्गातील यादी तयार करण्यात येऊन त्यानुसार उमेदवारास मिळालेल्या गुणवत्तेनुसार नियुक्ती देण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहील.

५.९ उमेदवारांना ज्या गट- ड (वर्ग-४) समकक्ष पदाकरीता, पात्र उमेदवारांना गट- ड (वर्ग-४) समकक्ष पदावर नियुक्तीसाठी निवड सूचीतील उमेदवार आवश्यक ती पात्रता पूर्ण करतील त्यांना कागदपत्रे पडताळणी अंती वैद्यकीय व चारित्र्य पडताळणी पूर्ण करून नियुक्तीपत्र देण्यात येतील नियुक्ती बाबतचे सर्व अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना असतील.

५.१० अंतिम निवड यादीतील पात्र उमेदवारांनी सादर केलेल्या विविध प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती मुळ प्रमाणपत्राच्या आधारे, कागदपत्रे तपासणी वेळी तपासण्यात येतील. सदर प्रमाणपत्राच्या मुळ प्रती कागदपत्र तपासण्याच्या वेळी उपलब्ध करून देणे उमेदवारांना बंधनकारक राहील. त्या मधील प्रमाणपत्रे खोटी किंवा चुकीची आढळल्यास त्यांना अपात्र ठरवून त्यांच्याविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

६ शैक्षणिक अहर्ता:-

६.१ जाहिराती मध्ये नमुद पदांसाठी अर्ज करण्यासाठी, जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकास उमेदवाराने पुढील प्रमाणे शैक्षणिक अहर्ता पुर्णतः धारण करणे आवश्यक आहे.

* महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचे दिनांक ६ जुन, २०१७ च्या अधिसूचने नुसार उमेदवार कोणत्याही शासन मान्यता प्राप्त माध्यमिक शालांत परीक्षा (१० वी) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

* उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

६.२ माजी सैनिकासाठी शैक्षणिक अहर्ता

तांत्रिक अथवा व्यावसायिक कामाचा अनुभव आवश्यक ठरविला नसलेल्या पदांच्या बाबतीत १५ वर्षे सेवा झालेल्या माजी सैनिकांनी एस.एस.सी. उत्तीर्ण असल्याचे किंवा इंडियन आर्मी स्पेशल सर्टिफिकेट एज्युकेशन अथवा तत्सम प्रमाणपत्र असल्यास ते अशा पदांना अर्ज करू शकतात.

७. पात्रता :-

७.१ भारतीय नागरिकत्व

७.२ वयोमर्यादा

७.२.१ वयोमर्यादा गणण्याचा दिनांक ३०/०५ /२०२५

७.२.२ विविध अराजपत्रित प्रवर्ग उपप्रवर्गासाठी किमान व कमाल वयोमर्यादा :-

| अ.क्र. | प्रवर्ग | आवश्यक वयोमर्यादा |
|---|---|---|
| १ | खुल्या प्रवर्गातील उमेदवारासाठी | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही २०१७/प्र.क्र.४०४/कार्या.१२, दिनांक २५ एप्रिल २०१६, मधील तरतुदी नुसार किमान १८ वर्षे पेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. |
| २ | मागासवर्गीय उमेदवारासाठी | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.४०४/कार्या १२, दिनांक २५ एप्रिल २०१६ मधील तरतुदी नुसार किमान १८ वर्षे पेक्षा कमी व ४३ वर्षे पेक्षा जास्त नसावे.<br>तथापी उन्नत व प्रगत गटांमध्ये क्रिमीलेयर (Creamy Layer) मोडणाऱ्या विजा अ, भ.ज.-ब, भ.ज.-क, भ.ज.-ड, वि.मा.प्र, इ.मा.व, एस.ई.बी.सी. आणि ई. डब्ल्यु एस (आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक) प्रवर्गातील उमेदवारांना ही वयाची सवलत लागु राहणार नाही. |
| ३ | पदविधारक अंशकालीन उमेदवारांसाठी | शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक अशंका-१११८/प्र.क्र.५०७/१६-अ दिनांक २ जानेवारी २०१९ नुसार तरतुदी नुसार कमाल वयोमर्यादा ५५ वर्ष राहील. |
| ४ | स्वतंत्र सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन १९९१ ची जनगणना कर्मचारी व सन १९९४ नंतर निवडणूक कर्मचारी यांचेसाठी. | महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.निवक १०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६-अ दि.०६/१०/२०१० मध्ये दिलेल्या निर्देशानुसार कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष इतकी राहील या घटकातील मागासवर्गीय उमेदवारांसाठी देखील उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्ष इतकी राहील. |
| ५ | खेळाडु उमेदवारांसाठी | शासन व शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दिनांक ०१.०७.२०१६ मधील तरतुदी नुसार ,खेळाडुची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन, सदर पदासाठी असलेल्या विहीत वयोमर्यादा ०५ वर्षा पर्यंत वयाची अट शिथील करण्यात येईल. तथापी उच्चतम वयोमर्यादा ४३ इतकी राहील. |
| ६ | दिव्यांग उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्हीजी-१०९८/प्र.क्र.३९/९८/१६-अ दिनांक १६/६/२००१ मधील तरतुदी नुसार, उच्चतम वयोमर्यादा सरसकट ४५ वर्ष इतकी राहील, तथापि, दिव्यांग प्रवर्गातील उमेदवारांचे किमान दिव्यांगत्वाचे प्रमाण ४० टक्के असल्याबाबतचे स्थायी वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे, तसेच त्यांची निवड झाल्यानंतर नियुक्ती आदेश निर्गमीत करण्यापुर्वी शासनाने नियुक्त केलेल्या तज्ञ वैद्यकीय मंडळाने तो उमेदवार संबंधित पदावर काम करू शकेल असे प्रमाणपत्र दिल्यानंतर त्याची अंतिम नियुक्ती केली जाईल. सदर प्रमाणपत्रावर उमेदवाराचा फोटो असणे आवश्यक आहे. दिव्यांग प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांचे दिव्यांग प्रमाणपत्र पडताळणी केल्यानंतरच नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील. |

| | | |
|---|---|---|
| ७ | प्रकल्पग्रस्त आणि भूकंपग्रस्त उमेदवारासाठी | महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग [illegible] [illegible] वर्षे इतकी राहील. [illegible] |
| ८ | माजी सैनिक उमेदवारासाठी | महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय [illegible] दिनांक [illegible] मधील तरतुदी नुसार माजी सैनिकांसाठी [illegible] सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात [illegible] कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील, [illegible] सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षपर्यंत राहील. |

परीक्षेचे स्वरुप व त्या अनुषंगिक सुचना

| अ.क्र. | पदाचे नाव | मराठी | | इंग्रजी | | सामान्य ज्ञान | | बौध्दिक चाचणी/ अंकगणित | | एकूण गुण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण |
| १ | गट-ड (वर्ग - ४) समकक्ष पदे व इतर संवर्ग | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | १०० | २०० |

* परीक्षा कालावधी २ तास (१२० मिनिटे)
* परीक्षेचे स्वरुप

१) परीक्षा ही ऑनलाईन (COMPUTER BASED TEST) पध्दतीने घेण्यात येईल.
२) परीक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील.
३) प्रश्नपत्रिकेतील प्रत्येक प्रश्नास ०२ गुण असतील.

४) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. प्रानिमं १२२२ प्र.क्र.५४/का १३-अ दिनांक ४ मे २०२२ मधील तरतुदी नुसार गट-ड (वर्ग-४) समकक्ष पदे व इतर संवर्गासाठी माध्यमिक शालांत परीक्षा (एस.एस.सी) ही कमीत कमी अर्हता असल्याने सदर पदासाठी परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त माध्यमिक शालांत परीक्षा (एस.एस.सी.) परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. मराठी व इंग्रजी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा माध्यमिक शालांत परीक्षेच्या (एस.एस.सी) च्या दर्जाच्या समान राहील व सदर परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणीत/बौध्दीक चाचणी या विषयावर प्रश्नाकरीता प्रत्येकी ५० गुण ठेवून एकूण २०० गुणांची ऑनलाईन (Computer Based Test) परीक्षा घेण्यात येईल.

५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन शासन निर्णय क्र. प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का १३ अ दिनांक ४ मे २०२२ मधील तरतुदी नुसार या पदांकरीता मौखिक परीक्षा (मुलाखती) घेण्यात येणार नाहीत.

६) उमेदवारांची निवडसूची तयार करण्यासाठी शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही १०१७/प्र.क्र.३५/९८/१६-अ दिनांक १६/०३/१९९९ आणि शासन शुध्दीपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्रमांक संकीर्ण

११९९/प्र.क्र.३९/१६-अ दिनांक १९/१२/२०१८ तसेच शासन निर्णय क्र.प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३ दिनांक ४ मे २०२२ अन्वये कार्यवाही करण्यात येईल.

७) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३ अ दिनांक ४ मे २०२२ मधील तरतुदी नुसार गुणवत्ता यादीमध्ये अंतर्भाव करण्यासाठी उमेदवारांनी एकूण गुणांच्या किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

८) परीक्षेचा निकाल (निवडसूची) तयार करतांना परीक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा प्राधान्यक्रम हा महाराष्ट्र शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३ अ दिनांक ४ मे २०२२ मध्ये नमुद निकषांच्या आधारे क्रमवार लावला जाईल.

परीक्षा ही Computer Based Test ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असून प्रत्येक सत्राच्या प्रश्नपत्रिका स्वतंत्रपणे उपलब्ध केल्या जाणार असून एकापेक्षा जास्त सत्रात परीक्षा आयोजित करण्यात येणार आहे. सत्र १ ते अंतिम सत्र यामधील प्रश्नपत्रिकेचे स्वरूप व त्याची काठीण्यता विचारात घेऊन त्याचे समानीकरण करण्याच्या (Normalization) पध्दतीने गुणांक निश्चित करून निकाल जाहीर करण्यात येईल. (Normalization) TCS कंपनीकडून देण्यात आलेले सूत्र वेबसाईटवर माहितीसाठी प्रकाशित केलेले आहे. सदर (Normalization) सर्व परीक्षार्थी यांना बंधनकारक राहील याची सर्व परीक्षार्थी यांनी नोंद घ्यावी.

८. विहित कागदपत्रे/प्रमाणपत्रे सलंग्न (Upload) करणे :-

एक) प्रोफाईलद्वारे केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने सदर परिक्षेकरीता अर्ज सादर करतांना खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक, अनाथ तसेच प्रकल्प ग्रस्त, भुकंपग्रस्त व पदवीधर अंशकालीन कर्मचारी आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे PDF फाईल फॉरमॅटमध्ये सलंग्न (Upload) करावीत.

दोन) विविध सामाजिक व समांतर आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांची पात्रता आजमावल्यानंतर (Check Eligibility) उमेदवार जाहिराती नुसार पात्र ठरत असल्यास अर्ज सादर करताना खालील कागदपत्रे/प्रमाणपत्रे (लागू असलेली) सलंग्न (Upload) करणे अनिवार्य आहे.

| अ.क्र. | प्रमाणपत्र/कागदपत्र | अ.क्र. | प्रमाणपत्र /कागदपत्र |
|---|---|---|---|
